

कुंडल : येथील क्रांती महाविद्यालयाच्या वर्धापनदिनी बोलताना उद्योजक उदय लाड. या वेळी किरण लाड, गोविंद डुबल, प्रा.प्रताप लाड, अशोक पवार आदी.

# शिक्षकांनो, विद्यार्थ्यांना माणूस म्हणून घडवा : लाड

कुंडल, ता. १३ : विद्यार्थी व शिक्षक या सर्वांनी स्पर्धेत टिकण्यासाठी गुणवत्तापूर्ण नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा, तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माणूस म्हणून घडविण्याचे काम करण्याची आजच्या आधुनिक युगात आवश्यकता असल्याचे मत प्रसिद्ध उद्योजक उदय लाड यांनी व्यक्त केले.

येथील क्रांती महाविद्यालयाच्या २६ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. यावेळी क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, संस्थेचे खजिनदार गोविंद डुबल, अशोक पवार, प्रा. डॉ. प्रताप लाड, डॉ. दत्तात्रय खळदकर उपस्थित होते. प्रारंभी महाविद्यालयाच्या ध्वजाला मान्यवरांच्या हस्ते वंदन करण्यात आले.

लाड म्हणाले, बदल हा निसर्गाचा नियम असल्याने कुंडल परिसरातील विद्यार्थ्यांना प्राथमिकपासून महाविद्यालयीन शिक्षण मिळावे, या उद्देशाने विद्यासंकुलाची उभारणी झाली. दिवंगत बापूसाहेबांच्या नावाने सुरू असलेले हे महाविद्यालय सर्वांना आदर्श ठरेल. किरण लाड म्हणाले, ध्येयाने प्रेरित झालेली माणसं काहीही करू शकतात. सध्याचे युग हे स्पर्धेचे असून पारंपरिक शिक्षणपद्धतीसह आधुनिक व तंत्रज्ञानावर आधारित व्यवसायाभिमुख शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे. यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

प्रा. प्रताप लाड, अशोक पवार आदींनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य आर. एस. डुबल यांनी स्वागत केले. प्रा. वंदना लोंढे, प्रा. भारती सुतार यांनी सूत्रसंचालन केले. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संयोजन केले. प्रा. सुभाष चवरे यांनी आभार मानले.

दै. सकाळ

दि. १४/०८/२०२४

# स्पर्धेत टिकण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक : उदय लाड

**केसरी वृत्तसेवा**

**कुंडल :** विद्यार्थी व शिक्षक या सर्वांनी स्पर्धेत टिकण्यासाठी गुणवत्तापुर्ण नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माणूस म्हणून घडविण्याचे काम करण्याची गरज आहे, असे मत उद्योजक उदय (आप्पा) लाड यांनी व्यक्त केले.

कुंडल येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या २६ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये ते बोलत होते. यावेळी क्रांती दुध संघाचे अध्यक्ष किरण लाड, संस्थेचे खजिनदार गोविंद डुबल, अशोक पवार, डॉ. प्रताप लाड, डॉ. दत्तात्रय खळदकर आदी उपस्थित होते.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उदय लाड पुढे म्हणाले, बदल हा निसर्गाचा नियम आहे. कुंडल परिसरातील विद्यार्थ्यांना प्राथमिकपासून महाविद्यालयीन शिक्षण मिळावे या उद्देशाने विद्यासंकुलाची उभारणी करण्यात आली.

किरण लाड म्हणाले, ध्येयाने प्रेरित झालेली माणसे काहीही करु शकतात. सध्याचे युग स्पर्धेचे युग असून पारंपारिक शिक्षण पद्धतीबरोबरच आधुनिक व तंत्रज्ञानावर आधारीत व्यवसायाभिमुक शिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

डॉ. प्रताप लाड, अशोक पवार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी केले. सुत्रसंचालन डॉ. वंदना लोंढे, प्रा. भारती सुतार यांनी केले. आभार डॉ. सुभाष चवरे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

दै. केसरी

दि. १६/०८/२०२४

# शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माणूस म्हणून घडविण्याची गरज : लाड

वार्ताहर

कुंडल

विद्यार्थी व शिक्षक या सर्वांनी स्पर्धेत टिकण्यासाठी गुणवत्तापूर्ण नवनवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करतानाच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना माणूस म्हणून घडविण्याचे काम करण्याची आजच्या आधुनिक युगात गरज असल्याचे मत प्रसिद्ध उद्योजक उदय (आप्पा) लाड यांनी काढले. ते कुंडल(पलूस) येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या २६ व्या वर्धापनदिना निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये ते बोलत होते.

यावेळी किरण लाड, गोविंद डुबल, अशोक पवार, प्रा.डॉ. प्रताप लाड, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दत्तात्रय खळदकर आदी उपस्थित होते.



कुंडल : येथील जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या २६ व्या वर्धापनदिना निमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये बोलताना उदय (आप्पा) लाड आदी.

प्रारंभी महाविद्यालयाच्या ध्वजाचे मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. उदय आप्पा पुढे म्हणाले, बदल हा निसर्गाचा नियम असल्याने कुंडल परिसरातील विद्यार्थ्यांना प्राथमिकपासून महाविद्यालयीन शिक्षण मिळावे म्हणून या विद्यासंकुलाची उभारणी झाली असून स्व. बापूसाहेबांच्या नावाने सुरु असलेले हे महाविद्यालय सर्वांना आदर्श ठरेल, असे गौरवोद्गार उदय आप्पानी काढले.

किरण लाड म्हणाले, ध्येयाने प्रेरीत झालेली माणस काहीही करु शकतात. सद्याचे युग हे स्पर्धेचे युग असून पारंपरिक शिक्षण पद्धतीबरोबरच आधुनिक व तंत्रज्ञानावर आधारीत व्यवसायाभिमुख शिक्षण ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांना मिळाले पाहिजे यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

प्रा. डॉ. प्रताप लाड, अशोक पवार आदिनी मनोगत व्यक्त केले, स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. वंदना लोंढे, प्रा. भारती सुतार यांनी तर या कार्यक्रमाचे संयोजन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. शेवटी आभार प्रा. डॉ. सुभाष चवरे यांनी मानले. यप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

दै. तरुण भारत

दि. १६/०८/२०२४